महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

समता न्याय एकात्मता

## समाज कल्याण आयुक्तालय,
## महाराष्ट्र राज्य, पुणे

# माहिती पुस्तिका

# समान संधी केंद्र
## (Equal Opportunity Center)


समान संधी केंद्र
(Equal Opportunity Center)



# मनोगत



समाजातील दुर्बल घटकांचा आर्थिक विकास करून समता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४६ अन्वये राज्यांवर सोपविलेली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने राज्याचा सामाजिक न्याय विभाग कार्यरत आहे.

महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे तसेच त्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी समान संधी केंद्र ( **Equal Opportunity Center** ) राज्यातील सर्व महाविद्यालयात सुरु करण्याची संकल्पना पुढे आली. या संकल्पनेस सामाजिक न्याय विभागाचे मा.मंत्री, मा.राज्यमंत्री व मा.सचिव यांनी प्रोत्साहित केले.

राज्यामधील युवकांच्या ज्ञानाचा व मानवी संसाधनाचा विकासाकरीता उपयोग होण्याच्या दृष्टीने तसेच बदलत्या काळानुसार शैक्षणिक क्षेत्रामधील स्पर्धा लक्षात घेवून संपन्न, समृध्द व सक्षम नागरीक समाज घडविण्याकरीता आणि सदर बाबीस चालना देण्याकरीता समानतेची संधी निर्माण होण्यासाठी समानसंधी केंद्राची आवश्यकता आहे. सदर बाब दृष्टीक्षेपासमोर ठेवून तसेच राज्याच्या कल्याणकारी धोरणाची संकल्पना, बाराव्या पंचवार्षिक योजनेमधील मार्गदर्शक तत्वे इत्यादी बाबी विचारात घेवून समानसंधी केंद्रांची महाविद्यालयामध्ये स्थापन करण्याचा निर्णय समाज कल्याण आयुक्तालयामार्फत घेण्यात आला.

या केंद्रांमधून शासनाची ध्येय, धोरणे, योजना, कार्यक्रम यांचा समाजातील दुर्लक्षित घटकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी या केंद्रामार्फत प्रयत्न करण्यात येणार आहेत. यासाठी हार्दिक शुभेच्छा.........

**डॉ.प्रशांत नारनवरे (भाप्रसे)**
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे



# समान संधी केंद्र (Equal Opportunity Center)

## प्रस्तावना

शासनाची ध्येय धोरणे, योजना, कार्यक्रम इत्यादीचा समाजातील दुर्लक्षीत घटकांना/गटांना उपयोग त्यांच्या व देशाच्या उन्नतीकरीता होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन समुपदेश, आर्थिक, सामाजिक आणि इतर बाबी संदर्भातील सहाय्य व विविधता महाविद्यालय परिसरातच उपलब्ध होणे आवश्यक आहे. सदर बाबी या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Equal Opportunity Center For Colleges XII २०१२ या प्लॅनमध्येच नमूद आहे. त्याचप्रमाणे भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ४६ नुसार अनुसूचित जाती, जमाती यांच्या कल्याणाची जबाबदारी राज्याची असल्याने व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाव्दारे सदर घटकांच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी होत असल्यामुळे महाविद्यालयामधील मागास प्रवर्गातील विद्यार्थी व इतर प्रवर्गातील विद्यार्थी यांना केंद्रबिंदु मानुन विभागामार्फत राज्यातील प्रत्येक महाविद्यालयांमध्ये समान संधी केंद्र (Equal Opportunity Center) स्थापन करण्याचा विचार डॉ. प्रशांत नारनवरे, आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या संकल्पनेतुन पुढे आला. याबाबत अधिक मार्गदर्शन मा. मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, व मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडून देखील प्रेरणा मिळाल्याने समान संधी केंद्र महाविद्यालयांमध्ये निर्माण करण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे.

राज्यामधील युवकांच्या ज्ञानाचा व मानवी संसाधनाचा विकासाकरीता उपयोग होण्याच्या दृष्टीने तसेच बदलत्या काळानुसार शैक्षणिक क्षेत्रामधील स्पर्धा लक्षात घेवून संपन्न, समृध्द व सक्षम नागरीक समाज घडविण्याकरीता आणि सदर बाबीस चालना देण्याकरीता समानतेची संधी निर्माण होण्यासाठी समानसंधी केंद्राची आवश्यकता आहे. सदर बाब दृष्टीक्षेपासमोर ठेवून तसेच राज्याच्या कल्याणकारी धोरणाची संकल्पना, बाराव्या पंचवार्षिक योजनेमधील मार्गदर्शक तत्वे इत्यादी बाबी विचारात घेवून समानसंधी केंद्रांची महाविद्यालयामध्ये स्थापन करण्याचा निर्णय आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. ४५८, दिनांक २८/०१/२०२२ अन्वये राज्यभरातील महाविद्यालयांना संबंधीत जिल्हयाच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेमार्फत निर्णय व सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुरोधाने, मा. मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२ ऑगष्ट, २०२१ रोजी झालेल्या व्हीडीओ कॉन्फरन्स बैठकीच्या अनुषंगाने महाविद्यालयातील मागासवर्गीय मुला-मुलींना शिष्यवृत्ती / फ्रीशिप इत्यादी योजना व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सोबतच उद्योजकता, व्यवसाय, रोजगार निर्मितीसाठी - आर्थिक न्यायासाठी मार्गदर्शन - संवाद अभियान तसेच युवा संवाद - कार्यक्रम सुरु करण्याकरीता महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता Equal Opportunity Center (समान संधी केंद्र) स्थापन करणे आवश्यक असल्याचे मा. मंत्री महोदय, यांनी निर्देशित केलेले आहे.

त्याचप्रमाणे केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमध्ये देखील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासह त्याचे सर्वांगिण विकास व व्यवसाय / रोजगार निर्मितीच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने विशेष उपाययोजना करणेबाबत निर्देशित केले आहे.

## संकल्पना

प्रत्येक महाविद्यालयात त्यांच्या महाविद्यालयातील किमान एक प्राध्यापक व त्यांना सहाय्यक म्हणून किमान १२ विद्यार्थी यांची मदत घेऊन महाविद्यालयात Equal Opportunity Center स्थापन करावेत व त्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याची आवश्यकता, रोजगार प्राप्तीसाठी किंवा उद्योजकता व व्यावसायिक होण्यासाठी कौशल्य शिक्षण या सर्व बाबींसह सर्वसमावेशक मार्गदर्शन करण्यात यावेत.

याकरिता सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या जिल्हयातील सर्व उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालये, वरिष्ठ महाविद्यालये तसेच इतर सर्व शैक्षणिक संस्था व त्यांच्या अधिपत्त्याखाली येणा–या सर्व महाविद्यालयामध्ये या स्वरुपाची केंद्रे तात्काळ चालू शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याबाबत सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे स्तरावरुन लेखी निर्देश देण्यांबाबत समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचे कडून वेळोवेळी निर्देशित करण्यात आलेले आहे.

तथापी सद्यस्थितीतील कोवीड–१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये नुकतीच प्रत्यक्षात चालू झाली असल्याने महाविद्यालयाने सदर Equal Opportunity Center ची त्वरित स्थापना करुन महाविद्यालय निहाय समन्वय अधिकारी यांची नियुक्ती करुन समाज प्रसार माध्यमांचा वापर करून अथवा Whatsapp ग्रुपचा उपयोग करुन संबंधीत महाविद्यालयात प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांशी समन्वय करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे प्रत्येक जिल्हयाच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या व्ही. सी. व्दारे बैठका घेऊन उपरोक्त सर्व सूचना देण्यांत याव्यात. याबाबत आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. ४५८, दिनांक २८/०१/२०२२ अन्वये सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांना सूचना निर्गमित करण्यांत आलेल्या आहेत.

## ठळक उद्दीष्टे :

- महाडीबीटी प्रणालीवरील भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व राज्य शासनाची शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनांचे अर्ज भरताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी व तद्संबंधी तक्रारींचे निवारण करून विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास सुलभता निर्माण करणे.
- समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणा–या परदेश शिष्यवृत्ती (Foreign Scholarship) तथा देशांतर्गत शिष्यवृत्ती योजनांबाबत माहिती देणे.
- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग, महिला, दिव्यांग व इतर दुर्लक्षित घटक यांचेकरीता असलेल्या शासनाच्या धोरणांची आणि कार्यक्रमांची समाजातील गटांना लाभ मिळवून देण्याकरीता समाज कल्याण विभागाच्या सर्व योजनांची माहिती देणे, समुपदेशन करणे याकरिता सहाय्यक आयुक्त स्तरावर जिल्हा समितीची स्थापना करणे.
- दुर्लक्षित घटकांना मार्गदर्शन, सल्ला आणि शैक्षणिक करीअरच्या दृष्टीने माहिती देणे. आर्थिक सामाजिक आणि इतर बाबी संदर्भातील विविधता महाविद्यालयीन परिसरामध्ये निर्माण करण्याकरीता कृती करणे.
- समता आणि समानसंधी समुदाय स्तरावरती निर्माण होण्याकरीता सामाजिक समावेशनाबाबत (Social inclusion) माहिती व मार्गदर्शनाचे कार्यवाही व कामकाज करणे.


- राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यामधील वैविधतापुर्ण गुणांच्या विकासाकरीता वाव निर्माण करणे तसेच शिक्षक आणि शिक्षकेत्तर वर्गामध्ये शोषणाबद्दल असलेल्या पुर्वग्रहदुषित संकल्पना संपुष्टात आणणे/नष्ट करणे.
- शैक्षणिक संवाद, आरोग्यदायी अंतरवैयक्तिक संबंधांची वाढ व सामाजिक दृष्ट्या अनुकुल वातावरण अशा विविध प्रकारच्या पार्श्वभुमीमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयामध्ये समान संधी केंद्राच्या माध्यमातून निर्माण करणे.
- दुर्लक्षित घटक व समाजातील घटकाकडून/विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या तक्रारी निवारण करून सदर तक्रारीवर सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करणे/समस्या सोडविणे.
- दुर्लक्षित घटकांसाठी असलेले कल्याणकारी कार्यक्रम, सामाजिक कल्याणकारी योजना. अधिसुचना, सुचना, शासनाचे कार्यालयीन आदेश आणि इतर संबंधित संस्था/घटक यांच्याकडून याबाबतीत वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश याबाबतची माहिती देणे.
- समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी/विद्यार्थ्यांसाठी अडथळा विरहीत औपचारीक बाबी, प्रवेश प्रक्रिया तसेच दुर्बल घटकांमधून येणाऱ्या दुर्लक्षित समाजातील विद्यार्थ्यांकरीता नोंदणी करून घेणे.
- समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी/विद्यार्थ्यांसाठी NSS या यंत्रणेव्दारे अथवा त्याच धर्तीच्या स्वतंत्र यंत्रणेव्दारे विद्यार्थ्यांकरीता Outreach Program राबविणे.
- मागासवर्गीय विद्यार्थी व वंचित गट/घटक यांचेकरीता शासन, शासनाची कार्यालये, संस्था इत्यादींशी शैक्षणिक आणि आर्थिक संसाधने उपलब्ध होण्याकरीता व सहाय्यासाठी समन्वय व संपर्क निर्माण करणे.
- विविध प्रकारच्या योजनांच्या प्रगती अहवालाबाबत बैठकांचे आयोजन करणे व आढावा घेणे.
- जिल्ह्यातील महाविद्यालयांच्या स्तरावर समान संधी केंद्राच्या वार्षिक कामकाजाची रुपरेषा, उद्दिष्ट, महिना निहाय तयार करणे व सदर बाबत अहवाल जिल्हा समितीस सादर करणे.

## समान संधी केंद्राची कार्य :

- महाविद्यालयामधील इच्छुक विद्यार्थी वर्गास समान संधी केंद्रामध्ये समाविष्ट करून घेणे व त्यांना स्थापित केंद्रामध्ये काम करण्याची संधी उपलब्ध करून देणे.
- विद्यार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणा–या शिष्यवृत्तीची माहिती तसेच CSR मार्फत देण्यात येणाऱ्या योजनांबाबत मार्गदर्शन देणे व सदर समितीची दरमहा महाविद्यालय स्तरावर बैठक आयोजित करणे.
- समितीच्या नियतकालिक बैठका/सेमिनार, चर्चासत्र, कार्यशाळा, व्याख्यान, सोशल मिडीया इत्यादीव्दारे कार्यक्रम आयोजित करून योजनांचे पर्यवेक्षण करणे, आढावा घेणे, नियंत्रण ठेवणे.
- शैक्षणिक प्रवेश, भरती प्रक्रिया एकुणच शैक्षणिक कामगिरी याबाबत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग यांना सदर बाबीचा उपयोग होत असलेबाबत खात्री करणे व तत्संबंधीत उपाययोजना करणे.
- तसेच महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांमार्फत विविध व्याख्यान कार्यक्रमांचे आयोजन करावे जेणे करून विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवांवरून विविध क्षेत्रातील स्पर्धा परीक्षेविषयक योग्य मार्गदर्शन देण्यात येईल व पुढील वाटचाली करीता मदत होईल.

- महाविद्यालयामधील विद्यार्थी समुदायास सामाजिक समावेशनामध्ये समाविष्ठ होण्याकरीता समानता व समानसंधी उपलब्ध करुन देणे व त्याची खात्री करणे.
- शिक्षक वर्ग/समुदायामध्ये समस्या सोडविण्यासाठी संवेदनशीलता निर्माण करणे व सामाजिक समायोजन तसेच वंचित समुदायाच्या विकासासाठी प्रयत्न करणे.
- उपेक्षित समुदायाच्या शैक्षणिक बाबी संदर्भातील समस्या, आकांक्षा, अपेक्षा याबाबत उपेक्षित घटकांप्रती संवेदनशीलता व Social Exclusion निर्माण करण्याकरीता प्रयत्नरत राहणे.
- उपेक्षित / वंचित समाजातील व्यक्ती किंवा गट यांच्या अडचणी सोडविण्याकरीता मदत करणे तसेच शोषणासंबंधित समस्येचे निवारण करणे.
- उपेक्षित घटकांच्या अडी–अडचणीचे निवारण करणे व सौहार्दपूर्ण उपाययोजना व तोडगा काढणे.
- उपेक्षित व कमकुवत घटकांसाठी असलेल्या कल्याणकारी योजना, कार्यक्रम, Notification, कार्यालयीन आदेश व तत्संबंधीत संस्था, संघटना यांनी वेळोवेळी प्रसारीत केलेल्या माहितीचा प्रचार प्रसार करणे, निदर्शनास आणणे.
- शैक्षणिक परिसरामध्ये व एकुणच शैक्षणिक बाबीकरीता अडथळा विरहीत वातावरण वंचित समुदायातील गटासाठी निर्माण करणे.

## समित्यांची रचना :




महाविद्यालय स्तारावरील समान संधी केंद्रे (EOC)

## जिल्हा समिती :

महाविद्यालयांमध्ये समान संधी केंद्रा संदर्भातील कामकाजाचे समन्वय साधण्यासाठी सहाय्यक आयुक्त स्तरावर जिल्हा समिती स्थापन होणे आवश्यक आहे. या समिती मार्फत सर्व महाविद्यालयांमध्ये उपेक्षित दुर्बल समुदायातील घटक /गट यांच्या करिता राबविण्यात येणा–या योजनांची अंमलबजावणीचा आढावा घेण्यात येईल. तसेच योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेकरिता येणा–या अडचणींबाबत उपाययोजना करण्यात येतील. सदर समिती ही सर्व समितींमध्ये समन्वय साधण्याचे काम करीत असल्याने सदर समितीची तीन महिन्यातून एकदा बैठक होणे अनिवार्य आहे. सदर समितीची रचना  सर्वसाधरणपणे खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | नाव, पदनाम व कार्यालय | समितीतील हुद्दा |
|---|---|---|
| १ | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण | अध्यक्ष |
| २ | कुलगुरू, यांनी नियुक्त केलेले विद्यापीठाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | D.T.E (Director of Technical Education) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | D.M.E (Director of Medical Education) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | उच्च शिक्षण विभाग कार्यालय (Higher Secondary) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | संबंधित शाखेचे समाज कल्याण निरीक्षक | सदस्य सचिव |

जिल्हा समितीव्दारे उपरोक्त नमुद बाबींशिवाय पुढील बाबींचे देखील कामकाज होणे गरजेचे आहे.

- समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणा–या कल्याणकारी योजना ज्यामध्ये प्रामुख्याने ॲट्रोसिटी बाबत योग्य माहिती पुरविणे. केंद्र आणि राज्य शासनाव्दारे पुरस्कृत कार्यक्रम, विद्यापीठ अनुदान आयोग आणि तशा प्रकारच्या संस्था, संघटना यांच्याव्दारे असलेल्या उपेक्षित घटकां करीताच्या धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकरीता देखरेख करणे. महिलांशी सौजन्याची वागणूक, महिलांचे शोषण, याबाबत जाणीव व जागृती करणे. समानसंधी केंद्राचे कामकाज हे उपेक्षित व वंचित घटकाकरीता जबाबदारीने व प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.
- महाविद्यालयांतील समित्यांचे प्रमुख यांच्या बैठकांचे आयोजन, सामाजिक समस्येला हाताळणाऱ्या तसेच लिंग आधारीत बाबीशी संबंधित संवेदनशीलतेने देखरेख व सल्ला यासाठी समितीचे कामकाज, विद्यार्थांना करिअर बाबत मार्गदर्शन करणेसाठी सारथी, अमृत, महाज्योती, बार्टी यांचे प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ मिळवून देणे.

## संनियंत्रण समिती:

जिल्हास्तरावरील सर्व समान संधी केंद्र यांचे सनियंत्रण करण्याकरीता प्रत्येक जिल्हयात जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हयास्तरीय संनियंत्रण समिती स्थापन करणे आवश्यक आहे. या समिती मार्फत सर्व महाविद्यालयांमध्ये उपेक्षित दुर्बल समुदायातील घटक /गट यांच्या करिता राबविण्यात येणा–या योजनांची अंमलबजावणीचा आढावा घेण्यात येईल. सदर समिती ही सर्व समितींमध्ये समन्वय साधण्याचे काम करीत असल्याने सदर समितीची तीन महिन्यातून एकदा बैठक होणे अनिवार्य आहे. सदर समितीची रचना सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | नाव, पदनाम व कार्यालय | समितीतील हुद्दा |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | कुलगुरू, यांनी नियुक्त केलेले विद्यापीठाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | D.T.E (Director of Technical Education) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | D.M.E (Director of Medical Education) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | उच्च शिक्षण विभाग कार्यालय (Higher Secondary) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण | सदस्य–सचिव |

## राज्यस्तरीय समिती :

राज्यातील सर्व जिल्हास्तरावरील समित्यांचे सनियंत्रण करण्याकरीता राज्यस्तरावर मा. आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती स्थापन करणे आवश्यक आहे. या समिती मार्फत सर्व जिल्हास्तरीय समित्यांमार्फत होणाऱ्या कामकाजाचे तसेच समान संधी केंद्राच्या कार्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे किंवा कसे याबाबत सदर समितीमार्फत नियंत्रण करण्यांत येईल. तसेच सदरील उपक्रमांमध्ये क्षेत्रियस्तरावरुन कळविलेल्या अडीअडचणी लक्षात घेऊन त्यामध्ये सुधारणा अथवा व्याप्ती वाढविणे याबाबत देखील समितीमार्फत धोरणात्मक निर्णय घेतले जातील. सदर समिती ही सर्व समितींमध्ये समन्वय साधण्याचे काम करीत असल्याने सदर समितीची तीन महिन्यातून एकदा बैठक होणे अनिवार्य आहे. सदर समितीची रचना सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | नाव, पदनाम व कार्यालय | समितीतील हुद्दा |
|---|---|---|
| १ | आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| २ | आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | आयुक्त, दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | कुलसचिव, सर्व विद्यापिठे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | संचालक, उच्च शिक्षण विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | संचालक, वैद्यकीय शिक्षण विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | संचालक तंत्र शिक्षण विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | संचालक, राज्य शिक्षण शुल्क समिती यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १० | प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व) | सदस्य |
| ११ | सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य–सचिव |

याव्यतिरिक्त जिल्हास्तर, प्रादेशिकस्तर तसेच राज्यस्तरावरील महाविद्यालयांमध्ये स्थापीत समान संधी केंद्राच्या उत्कृष्ठ कामगिरीकरीता राज्यस्तरीय समितीमार्फत वार्षिक परिक्षण करण्यांत येईल व परिक्षणातील यशस्वी समान संधी केंद्रांना पुरस्कार प्रदान करण्यांत येईल.

## सल्लागार समिती :

महाविद्यालयांमध्ये समानसंधी केंद्रासंदर्भातील कामकाजाच्या अनुषंगाने महाविद्यालयामध्ये सल्लागार समिती स्थापन होणे आवश्यक आहे, यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य हे अध्यक्ष आणि इतर तीन सदस्य, सल्लागार असणे आवश्यक आहे. सदर समितीची रचना खालील प्रमाणे असावी.

| अ.क्र. | नाव, पदनाम व कार्यालय | समितीतील हुद्दा |
|---|---|---|
| १ | संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य | अध्यक्ष |
| २ | सल्लागार क्रमांक–१ महाविद्यालयातील विभाग प्रमुख | सदस्य |
| ३ | सल्लागार क्रमांक–२ महाविद्यालयातील विभाग प्रमुख | सदस्य |
| ४ | सल्लागार क्रमांक–३ महाविद्यालयातील विभाग प्रमुख | सदस्य– सचिव |

या सल्लागार समिती मार्फत योजनांची अंमलबजावणी उपेक्षित दुर्बल समुदायातील घटक /गट यांच्याकरीता महाविद्यालयामध्ये प्रभावीरित्या आढावा होतो किंवा कसे? याबाबत यांचेकडून Review होणे आवश्यक आहे, तसेच महाविद्यालयांतर्गत आरक्षण धोरण हे प्रवेश प्रक्रिया, भरती व इतर बाबींमध्ये होणेकरीता सदरील सल्लागार समितीचे कार्य आवश्यक आहे.

समितीची चार महिन्यातून एकदा बैठक होणे अनिवार्य असणे आवश्यक असून निर्णय व आढावा घेण्यासंदर्भात वेळोवेळी बैठका होणे गरजेचे आहे. महाविद्यालयातील प्राचार्य यांनी उपजतच उपेक्षित समुदायातील गट/घटक यांच्यासाठी कामकाज करणाऱ्या सदर बाबमध्ये स्वारस्य असणाऱ्या व्यक्तीस सल्लागार समितीमध्ये नामनिर्देशित करणे आवश्यक आहे.

सल्लागार समितीव्दारे उपरोक्त नमुद बाबींशिवाय पुढील बाबींचे देखील कामकाज होणे गरजेचे आहे.

- कल्याणकारी योजना केंद्र आणि राज्य शासनाव्दारे पुरस्कृत कार्यक्रम, विद्यापीठ अनुदान आयोग आणि तशा प्रकारच्या संस्था, संघटना यांच्याव्दारे असलेल्या उपेक्षित घटकांकरीताच्या धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकरीता देखरेख करणे.
- अनुसूचित जाती, जमाती विभाग/समानसंधी केंद्र इत्यादीचे कामकाज हे जबाबदारीने व प्रभावीपणे उपेक्षित व वंचित घटकाकरीता कार्याकरीता उत्तरदायी असणे.
- विविध समित्यांचे प्रमुख यांच्या बैठकांचे आयोजन, सामाजिक समस्येला हाताळणाऱ्या Issue बाबत तसेच लिंग आधारीत बाबीशी संबंधित समित्याबाबत संवेदनशीलतेच्या अनुषंगाने देखरेख व सल्ला याबाबतचे कामकाज.

## समान संधी केंद्राव्दारे सहाय्याचे स्वरुप :

समान संधी केंद्राव्दारे उपेक्षित समुदायातील अनुसूचित जाती, जमाती इतर मागासवर्ग विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, दिव्यांग, महिला इत्यादींना विविध स्वरुपाचे सहाय्य करणे आवश्यक राहील. यामध्ये पुढीलबाबी प्रामुख्याने असाव्यात.

१. उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य व मार्गदर्शन

२. उच्च शिक्षणाच्या संधी व उच्च शिक्षणासंदर्भातील क्षेत्रे,

३. उद्योजकीय क्षेत्रे, त्याबाबतच्या संधी

४. संशोधन विषयक संधी व शिक्षणाचे क्षेत्र

५. सुधारात्मक प्रशिक्षण व योजना

६. महिला अभ्यास केंद्र संस्था व महाविद्यालय
७. लोकसंख्या शिक्षण विभाग
८. आर्टीफिशिअल इंटेलीजन्स
९. करीअर कट्टा, नोकरी मार्गदर्शन यांसारख्या उपक्रम हे समानसंधी केंद्राची संलग्नित
१०. स्पर्धा परिक्षा, युवा संवाद, युवा नेतृत्व
११. देश–विदेशातील संधी
१२. कौशल्य विकास कार्यक्रम व योजना
१३. सोशल मिडीयाचा वापर (Telegram. Whatspp, Twitter YouTube. Facebook)
१४. शासनाच्या विविध विभागांचे योजनांची माहिती.

## समुपदेशन :

समान संधी केंद्राव्दारे उपेक्षित समुदायातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, दिव्यांग, महिला व महाविद्यालयांमधील विद्यार्थी यांना विविध प्रकारचे सहाय्य व मार्गदर्शनासोबतचे शैक्षणिक, कौटुंबीक, सामाजिक, कायदेविषयक आर्थिक बाबींसंदर्भात समुपदेशनाचे कामकाज समान संधी केंद्राव्दारे होणे आवश्यक आहे.

## अधिनस्त समित्या :

विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता Equal Opportunity Center च्या अधिनस्त नियुक्त करण्यात येणा–या समन्वय समिती अंतर्गत शाखा निहाय/विषय तज्ञांचा समिती असावी अथवा त्यांना देखील समन्वय समितीमध्ये नामनिर्देशीत सदस्य म्हणून असणे विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे. Equal Opportunity Center करिता मध्यवर्ती समिती स्थापन करुन प्रत्येक कॉलेजचा समन्वयक हे समितीमध्ये असावे.

## विद्यार्थी अडचणीसाठी संपर्क कक्ष :

समान संधी केंद्रांतर्गत विद्यार्थ्यांना संघलोकसेवा आयोग, स्टाफ सिलेक्शन कमीशन, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग व इतर स्पर्धात्मक परिक्षाकरीता महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी यांच्या अडीअडचणींचे वर्गीकरण करुन निवारण करण्याकरीता महाविद्यालयामध्ये संपर्क कक्ष समान संधी केंद्राच्या अधिनस्त असणे आवश्यक आहे. याशिवाय सदर कक्षाव्दारे भावनिक संतुलन बिघाड, सामाजिक समायोजन समस्या करिअर संबंधी समस्या तणाव, भिती इत्यादी बाबींची संपर्क कक्षाव्दारे नोंद होण्याकरीता आवेदन पत्र अथवा तशा प्रकारची सुविधा समान संधी केंद्राच्या अधिनस्त विद्यार्थी संपर्क कक्षामध्ये असणे आवश्यक आहे.

याकरिता महाविद्यालयांमध्ये “Career Katta, Student’s Corner” सारख्या संकल्पना राबविण्यात याव्यात. महाविद्यालयांच्या Website वर समान संधी केंद्राबाबत पुरेश्या प्रमाणात माहिती उपलब्ध करून द्यावी ज्यामध्ये समन्वय अधिका–यांचे संपर्क क्रमांक / ईमेल–आयडी उपलब्ध करून द्यावेत जेणे करून विद्यार्थ्यांना सुलभतेने त्यांच्या अडचणींचे निवारण करता येईल.



समता न्याय एकात्मता


# समाज कल्याण आयुक्तालय

३ चर्च रोड, पुणे ४११ ००१.

दूरध्वनी : ०२०-२६१२२६५२ / २६१३७१८६

**e-mail : directorsocialwelfare@yahoo.co.in**


अधिक माहितीकरिता आपल्या जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांच्याशी संपर्क साधावा.

सदरची माहिती पुस्तिका डाऊनलोड करण्याकरिता
वरील **QR Code** स्कॅन करावा.